MHPU230030862022

## आदेश नि.क्र १६ वर

(सौ. रूपाली रोमण वि. सचिन रोमन)

१. **अर्जदाराचे कथन थोडक्यात खालीलप्रमाणे** –

अर्जदार व जाबदेणार क्र १ हे पती पत्नी असुन त्यांचा विवाह दि.०३.०६.२०११ रोजी गांव मौजे श्रीपालवन ता. माण जि. सातारा येथे हिंदु वैदीक पध्दतीने झाला आहे. सदर विवाह बंधनातुन अर्जदार व जाबदेणार क्र.१ यांना दोन मुले कु. स्वरूप व कु. समृध्दी आहे. लग्नानंतर अर्जदार ही जाबदेणार यांचेकडे नांदण्यास कोळेवाडी पो. महीमानगड ता. माण जि. सातारा येथे आली. लग्नानंतर साधारणतः एक वर्षभर त्यांचे व्यवस्थीत चालले होते परंतु त्यानंतर जाबदेणार क्र.१ याने अर्जदार हिचे घरातील लोकांना वाईट शब्दात शिवीगाळ करून मानसीक व शारीरीक त्रास देण्यास सुरूवात केली. जाबदेणार क्र.१ हा वाकी बु. ता. खेड येथील ब्रेक्स इंडीया या कंपनीत ऑपरेटर म्हणुन नोकरीस आहे. जाबदेणार क्र.१ हा सातारा सोडुन पुणे जिल्हा चाकण येथे नोकरी करत असल्यामुळे तो अर्जदार हिस म्हणत असे की, '' माझे कोणीही वाकड करू शकत नाही. जाबदेणार क्र.१ याने मित्रांसोबत दारू पिण्यास सुरूवात केली व अर्जदार हिचे कडे नवीन घर/फ्लॅट घेणेकरीता पाच लाखांची मागणी केली. सन २०१२ मध्ये जाबदेणाराने अर्जदार हिस गरोदर असताना शिवीगाळ करून कॉटला बांधुन अमाणुसपणे मारहाण केली व गरम पाणी तिचे पोटावर ओतले. जाबदेणार क्र.१ याने खेड येथे फलॅट भाडयाने घेणेकरीता रक्कम रू ५० हजाराची मागणी केली. अर्जदाराचे वडीलांनी असमर्थता दर्शविली असता जाबदेणार क्र.१ याने अर्जदारास गळयास पकडुन भिंतीवर डोके आपटले व तिचा छळ केला. जाबदेणार क्र.१ ने पादत्राणे व्यवसायाकरीता अर्जदारास वडीलांकडुन पाच लाख घेवुन येण्याची मागणी केली. मुलीच्या सुखासाठी अर्जदाराचे वडीलांनी जाबदेणार क्र.१ यांचे दुकान उभारणीकरीता पाच लाख रूपयाची माल भरून दिला.

२. दि. ६.५.२०२२ रोजी जाबदेणार क्र.१ याने अर्जदाराकडे व्यवसायासाठी रोख रक्कमेची मागणी करून शेतात असणार हिस्सा वडीलांकडुन मागुन घे असे म्हणत, अर्जदाराला उपाशी ठेवुन अमानुषपणे मारहाण केली व घरात कोंडुन ठेवले. दुसरे दिवशी अर्जदार हिला सोडले असता अर्जदाराने सर्व प्रकार तिचे आईवडीलांना सांगितला. अर्जदाराचे आईवडीलांनी जाबदेणार क्र.१ यास

समजुन सांगण्याचा प्रयत्न केला असता त्यांनी त्यांचेकडे पाच लाख रूपयाची मागणी केली व न दिल्यास सोडचिठठी दया असे म्हणाले. नाईलाजास्तव अर्जदाराने दि. ३१.५.२०२२ रोजी खेड पोलीस स्टेशन येथे जाबदेणाराविरूध्द तक्रार दिली. त्यामुळे चिडुन जावुन जाबदेणार क्र.१ याने अर्जदारांचा त्याग करून राजगुरूनगर सोडुन निघुन गेले. जाबदेणार हे जाणुनबुजून अर्जदारांना त्रास होईल व त्यांची अर्थीक कोंडी करण्यासाठी निघुन गेले आहेत. त्यानंतर जाबदेणार यांनी अर्जदाराची साधी चौकशीही केली नाही. अर्जदार ही तिचे भावाचे व वडीलांचे मदतीने अर्जदार क्र.२ व ३ यांचा सांभाळ करून त्यांना शिक्षण देत आहे. जाबदेणार क्र.१ व २ हे खुनशी आडदांड असल्याने ते अर्जदारास फोन करून शिवीगाळ व धमकी देत आहेत तसेच अर्जदारास टाळुन दुसरे लग्न करण्याची भाशा करीत आहेत. अर्जदार रहात असलेल्या घराचा ताबा जबरदस्तीने घेण्याची भाषा करीत आहेत त्यामुळे अर्जदार ही उघडयावर येण्याची भिती आहे. अर्जदारास उत्पन्नाचे व उपजिवीकेचे कोणतेही साधन नाही त्यामुळे अर्जदाराने प्रस्तुत अर्जामध्ये जाबदेणाराकडून तिला पोटगीपोटी रक्कम रू.२५,०००/– दरमहा मागणी केली आहे.

**३.** अर्जदाराने पुढे असेही कथन केले आहे की, जाबदेणार यांची अर्थीक परिस्थीती चांगली असुन जाबदेणार क्र. १ हा नोकरीला असुन तो ब्रेक्स इंडीया लि. येथे नोकरी करीत आहे व त्यास महीन्याचा खर्च वजा जाता २६ हजार रूपये वेतन मिळत आहे. जाबदेणार क्र.२ यांची गावी मौजे कोळेवाडी ता माण जि. पुणे येथे अंदाजे ४.५ एकर बागायत जमीन असुन त्यांचे वार्षीक उत्पन्न सुमारे सात लाख रूपये इतके आहे.

**४.** जाबदेणार यांनी अर्जामध्ये हजर होवून त्याचा लेखी जबाब नि.२२ वर दाखल करून त्यांचे लग्न मान्य करून अर्जदाराच्या अर्जातील इतर कथने नाकारली आहेत. जाबदेणार यांना अर्जदार हि तिचे मुलांना भेटू देत नाही व पितृ सुखापासुन जाणीवपुर्वक वंचीत ठेवले आहे. अर्जदार ही जाबदेणार यांना त्यांच्या मुलांना शाळेत भेटण्यासही परवानंगी देत नाही. जाबदेणार क्र.१ यांनी अर्जदाराचा कोणत्याही प्रकारचा मानसीक व शारीरीक छळ केला नाही. जाबदेणार यांची कंपनी बदं पडल्यापासुन तसेच स्परूप फुटवेअर व्यवसाय बंद झाल्यापासुन जाबदेणार क्र.१ हे बेरोजगार असुन वडीलांच्या शेतात शेतमजुरी करत आहेत त्यामुळे अर्जदाराचा अर्ज नामंजुर करण्याची विनंती केली आहे.

**५.** अर्जदार व जाबदेणाराचे म्हणणे ऐकुण घेतल्यानंतर खालील मुददे उपस्थीत होतात त्यावरील निष्कर्ष मी कारणांसह खालीलप्रमाणे नोंदवित आहे,

| | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १ | अर्जदार प्रथम दर्शनी असे सिध्द करते काय, कि जाबदेणारांमार्फत तिचेवर कौटूंबिक हिंसाचार झाला आहे ? | होय |
| २ | अर्जदार हे जाबदेणाराकडून पोटगी मिळण्यास पात्र आहेत काय ? असल्यास किती ? | होय, अर्जदार क्र.१ ते ३ एकत्रीतरित्या दरमहा रक्कम रू.६०००/– |

## कारणमिमांसा

**मुददा क्र १ व २ करीता** –

अर्जदार व जाबदेणार यांच्या विदवान अधिवक्ता यांचा युकतीवाद ऐकला. अर्जदाराच्या विदवान अधिवक्तया यांनी असा युक्तीवाद केला कि जाबदेणाराकडे उत्पन्नाचे साधन असुन सुध्दा त्याने अर्जदाराची उपेक्षा केली आहे त्यामुळे अर्जदाराला मागणीप्रमाणे पोटगी मंजुर करावी. याउलट जाबदेणाराचे विदवान अधिवक्ता यांनी युक्तीवाद केला की, जाबदेणाराने अर्जदारांवर कोणताही कौटूंबिक हिंसाचार केला नाही करीता अर्ज खारीज करण्याची विनंती केली आहे. दोन्ही बाजुचा युक्तीवाद ऐकला. दस्ताऐवजांचे अवलोकन केले.

६. सद्यस्थितीमध्ये अर्जदार हीला उत्पन्नाचे साधन आहे किंवा नाही तसेच ती व तिचे मुलांची उपजिवीका व त्यांचे शिक्षण करू शकते किंवा नाही हे पाहणे आवश्यक आहे. अर्जदाराने शपथेवर कथन केले आहे कि जाबदेणार यांनी तिचा शारीरीक व मानसीक छळ केला. जाबदेणारांच्या त्रासाला कंटाळुन अर्जदार हिला तिच्या माहेरी वडीलांकडे रहावे लागत आहे. अर्जदाराने केलेल्या सत्यप्रतिज्ञेवरील कथनावरून तसेच संरक्षण अधिकारी यांचा अहवाल नि.६ वरून प्रथमदर्शनी ती जाबदेणाराचे हस्ते कौटूंबिक हिंसाचाराची बळी पडली हे दिसुन येते. अर्जदाराने जाबदेणार क्र.१ च्या उत्पन्नाबाबत त्यांचा घराचा उतारा तसेच गाव कोळेवाडी ता. माण जि. सातारा येथील जमीनीचा ८अ चा खाते क्र १७२४ चा उतारा, तसेच गट क्र. ६१, ७२ आणि ६८८ चे ७/१२ उता–याच्या प्रती दाखल केल्या आहेत. तसेच जाबदेणार क्र.१ ब्रेक्स इंडीया प्रा. लि. या कंपनीच्या जाबदेणार क्र.१ यांचे माहे जानेवारी २०१८ च्या पगार पत्रकाची प्रत दाखल केली आहे. जाबदेणार क्र.१ याने त्याचे जबाबात नमुद केले आहे की, त्यांची कंपनी बंद पडली असुन तो कोठेही कामधंदा करीत नाही. परंतु जाबदेणार क्र.१ यांनी त्यांचे जबाबात मान्य केले आहे की तो त्याचे वडीलांचे शेतात शेतमजुरी करीत

आहे. निश्चीतच सदर अर्ज अंतीमतः निकाली काढण्याकरीता कालावधी लागणार आहे. जाबदेणार याने स्वतः मान्य केले आहे की, तो त्यांच्या वडीलांच्या शेतात काम करीत आहेत. जाबदेणार हा धडधाकट असुन तो कामधंदा करू शकतो. प्रकरणातील परिस्थीती लक्षात घेता अर्जदार व तिच्या मुलांच्या दैनंदिन व शैक्षणीक गरजांकरीता जाबदेणार क्र.१ कडून अंतरीम उदरनिर्वाह भत्ता मिळण्यास पात्र आहे.

**७.** आज रोजी जिवनावश्यक वस्तुंच्या किंमती हया झपाटयाने वाढत आहेत. एका व्यक्तीला लागणारा खर्च लक्षात घेणे योग्य होईल. अर्जदार व तिच्या मुलांचा उदरनिर्वाह सुरळीत पार पाडण्याकरीता तिला एकत्रीतरित्या रक्कम रू. ६०००/– प्रति महा अर्ज दाखल तारखेपासुन मुख्य अर्जाचा निकाल लागेपर्यंत अंतरीम निर्वाह भत्ता मंजुर करणे न्यायोचित आहे. करिता वरील विवेचनावरून मी मुददा क्र १ व २ ला होकारार्थी उत्तर नोंदवित असुन खालीलप्रमाणे आदेश पारीत करण्यात येत आहे.

**<u>आदेश</u>**

१. अर्ज अंशतः मंजुर करण्यात येत आहे.

२. जाबदेणार क्र.१ याने अर्जदार क्र.१ ते ३ यांना अंतरीम निर्वाह भत्ता पोटगी म्हणुन एकत्रीतरित्या रक्कम रू ६०००/–(सहा हजार) प्रतिमहा अर्ज दाखल तारखेपासुन ते अंतीम अर्जाचा निकाल लागेपर्यंत उदरनिर्वाह भत्ता दयावा असा आदेश देण्यात येतो.

३. सदर अर्जाची प्रत अर्जदाराला देण्यात यावी.

Sd/xx

खेड–राजगुरूनगर (**एस.बी.पवार**)

दि. २६.३.२०२४ न्यायदंडाधिकारी प्रथमवर्ग न्यायालय क्र १ खेड–राजगुरूनगर

I affirm that the contents of this PDF file judgment are same word for ward as per original judgment.

| | |
|---|---|
| Name of Steno | : Gilbile A.D. |
| Court Name | : S.B.Pawar, JMFC Court No.1 Khed |
| Date | : 26.03.2024 |
| signed by P.O. on | : 27.03.2024 |
| uploaded on | : 28.03.2024 |